रयत शिक्षण संस्था, सातारा.

इयत्ता - ७ वी | प्रथम सत्र परीक्षा २०२४ - २५ | गुण - ५०

वेळ - २.३० तास | विषय - समाजशास्त्र | पेजेस - ४

---

सूचना- १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

२) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

३) प्रश्न क्रमांक १ ते ३ इतिहास व प्रश्न क्रमांक ४ व ५ नागरिकशास्त्र विषयावरील आहेत.

## * इतिहास *

१. अ) लिहिते व्हा. ( एका वाक्यात उत्तरे लिहा.) २

१) ताम्रपट म्हणजे काय ?


२) बहमनी राज्याच्या पहिला सुलतान कोण ?

ब) योग्य जोड्या जुळवा. ३

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) गोंडवनची राणी | अ) विशाळगड |
| २) शीख धर्म | ब) प्रतापगड |
| ३) खेळणा किल्ला | क) राणी दुर्गावती |
| | ड) गुरूनानक |

२. अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) ६

१) खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




२) भक्ती चळवळीविषयी थोडक्यात माहिती लिहा.

३) दुष्काळ हे रयतेला मोठे संकट का वाटत होते ?

४) महमूद गावानने कोणत्या सुधारणा केल्या ?

ब) का ते लिहा. (कोणतेही दोन) ४

१) संत कबीर हे भक्ती चळवळीतील एक विख्यात संत म्हणून उदयास आले.

२) शिवाजी महाराजांनी मुघलांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला.

३) शिलालेख हा इतिहास लेखनाचा विश्‍वसनीय पुरावा मानला जातो.

३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणताही एक) ३

१) नाणी इतिहास कसा सांगतात ?

२) संत ज्ञानेश्वर यांचे कार्य लिहा.

## * नागरिक शास्त्र *

४. अ)रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. २

१) संविधान सभेचे अध्यक्ष .................... हे होते.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) डॉ. राजेंद्रप्रसाद

क) दुर्गाबाई देशमुख ड) बी. एन. राव

२) संघशासनालाच .................... असेही म्हणतात.

अ) केंद्रशासन ब) राज्यशासन

क) राज्यसूची ड) समवर्ती सूची

ब) अ) खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा. (कोणताही एक) २

भारतीय संसदेत यांचा समावेश होतो.

↓ राष्ट्रपती | ↓ ............ | ↓ ............

ब) भारतीय नागरिकांना दिलेली तीन मूल्यांची हमी

↓ न्याय | ↓ ............ | ↓ ............

५. लिहिते व्हा. (कोणताही एक) ३

१) 'प्रौढ मतदान पध्दती' म्हणजे काय ?

२) रोषाधिकार म्हणजे काय ?

## * भूगोल *

१. अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. ३

१) हवा उंच गेल्यावर ........... होते.

अ) दाट  ब) विरळ  क) उष्ण

२) भरतीच्या पाण्याचा ........... व्यवसायास फायदा होतो.

अ) मासेमारी  ब) शेती  क) खाणकाम

३) पृथ्वीला परिवलनासाठी सुमारे .......... तास लागतात.

अ) १२  ब) २४  क) ४८

ब) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा. २

१) पृथ्वी स्वत:भोवती फिरताना पूर्वेकडून पश्चिमेकडे फिरते.

२) वारे हवेच्या जास्त दाबाकडून हवेच्या कमी दाबाकडे वाहतात.

२. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) २

१) कोणत्या वाऱ्यांना 'हंगामी वारे' म्हणतात.

२) उष्ण वाळवंटी प्रदेशात कोणते पाळीव प्राणी आढळतात ?

३) लाटेच्या निर्मितीचे मुख्य कारण कोणते ?

ब) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन) ४

१) काही ठिकाणी किनाऱ्याजवळील सखल प्रदेश खाजणाचा किंवा दलदलीचा बनतो.

२) दर पौर्णिमेस चंद्रग्रहण होत नाही.

३) हवादाब पट्ट्यांचे आंदोलन होते.

४) विषुववृत्तीय वनातील वृक्ष उंच वाढतात.

३. अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) ४


१) त्सुनामी लाटांविषयी माहिती लिहा.

२) हवेच्या दाबावर तापमानाचा कोणता परिणाम होतो ?

३) पृथ्वीच्या परिवलनाचा वाऱ्यांवर कोणता परिणाम होतो ?

४) हवादाबमापकाविषयी थोडक्यात माहिती लिहा.

ब) खालील आकृतीचे निरीक्षण करुन दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) २




१) उष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये कोणता दाबपदट्टा प्रामुख्याने आढळतो ?

२) ध्रुविय वारे कोणत्या कटिबंधात येतात ?

३) पृथ्वीच्या मध्यातून गेलेले वृत्त कोणते ?

क) सुबक आकृती काढून नावे द्या. (कोणतीही एक) २

१) चंद्राची स्थिती.

२) लाटेची रचना.

४. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) ६

१) मोसमी प्रदेशांखाली दिलेली वैशिष्ट्ये कोणती ?

२) ग्रहीय वाऱ्यांचे प्रकार स्पष्ट करा.

३) सूर्यग्रहणाची वैशिष्ट्ये लिहा.